## प्रकरण दुसरे

# योगीराज वाघमारे : व्यक्ती आणि व्यक्तिमत्व

# प्रकरण दुसरे
# योगीराज वाघमारे : व्यक्ती आणि व्यक्तिमत्त्व

**प्रास्ताविक**

योगीराज वाघमारे यांच्या कादंबऱ्याचा अभ्यास करताना त्यांच्या जीवनाचा व लेखनाचा परिचय करून घेणे महत्त्वाचे ठरते. तसेच लेखकाच्या साहित्यकृतीचा अभ्यास करताना त्यांच्या लौकीक जीवनाचा वेध घेणे गरजेचे ठरते. योगीराज वाघमारे यांच्या व्यक्तिमत्वाचा, साहित्याचा अभ्यास करताना जन्म, शिक्षण, बालमित्र, छंद, स्वभाव, नोकरी त्याचबरोबर त्यांचे साहित्यविश्व, त्यांना मिळालेले पुरस्कार. तसेच त्यांची साहित्यविषयक जडण घडण, लेखनाच्या प्रेरणा, समाजकालीन लेखक व त्यांचे स्थान पाहणे उचित ठरते.

**जन्म**

श्री योगीराज देवराव वाघमारे यांचा जन्म १ ऑक्टोंबर १९४३ रोजी मु. पो. येरमाळा, ता. कळंब जि. उस्मानाबाद या ठिकाणी झाला. त्यांचा जन्म अत्यंत गरीब दलित कुटुंबात झाला.

**शिक्षण**

योगीराज वाघमारे यांनी खूप कष्टातून आपले शिक्षण पूर्ण केले. घरची गरीब परिस्थिती व त्यात कुटुंब मोठे त्यामुळे शिक्षण घेत असताना खूप अडचणी निर्माण झाल्या. पण तरीसुद्धा योगीराज वाघमारे यांनी चिकाटीने आपले शिक्षण पूर्ण केले.

त्यांचे प्राथमिक शिक्षण (१९५०-५४) १ ते ४ इयत्तेपर्यंत येरमाळा येथे झाले त्यावेळी शाळा लोकल बोर्ड चालवित असे. त्यानंतर त्यांनी आपले माध्यमिक शिक्षण (१९५५-६१) ५ वी ते १० पर्यंत त्यांनी येरमाळा येथे पूर्ण केले, पुढील महाविद्यालयीन शिक्षण (१९६१-६५) 'पीपल्स् एज्युकेशन सोसायटी, मुंबई संचलित 'मिलिंद

महाविद्यालय' औरंगाबाद येथे पदवी पर्यंतचे शिक्षण झाले. सदरची संस्था भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यानी स्थापन केलेली आहे. पदव्युत्तर शिक्षण एम्. ए. (मराठी) (१९७६) साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथून बहिस्थरित्या पूर्ण केले.

योगीराज वाघमारे यांनी बी. एड्. ही पदवी गव्हर्मेंट बी. एड् महाविद्यालय अंबाजोगाई जि. बीड येथून १९६९ साली पूर्ण केली. हे महाविद्यालय अंबाजोगाई मराठवाडा विद्यापीठ यांच्याशी संलग्न आहे.

**कौटुंबिक स्थिती**

योगीराज वाघमारे यांच्या घरची परिस्थिती अत्यंत गरीबीची होती. त्यांचे वडील देवराव जयवंतराव वाघमारे हे गवंडी काम करायचे. त्यांचे शिक्षण फारसे नव्हते. पण त्यांना थोडीफार अक्षर ओळख होती. त्यांच्या आई लक्ष्मीबाई ह्या घरकाम आणि मोलमजुरी करायच्या त्या निरक्षर होत्या.

योगीराज वाघमारे यांना विष्णू, सोमनाथ, वसंत हे तीन भाऊ व कावेरी, सुमन, कस्तुरी ह्या तीन बहिणी असा परिवार आहे. त्यातील थोरले बंधू विष्णू व कावेरी, सुमन ह्या बहिणी मयत आहेत. त्यांचे थोरले बंधू गवंडी काम करायचे. अधुन मधून बॅण्ड वाजवायचे. घरची गरीब परिस्थिती असूनसुद्धा त्यांच्या वडिलांनी सर्वांना शाळेत घातलेले होते. योगीराज यांच्या दोन बहिणी सातवीपर्यंत शिकलेल्या होत्या. त्यांच्या गावात मराठवाड्यातील निजाम राजवट होती तेव्हा अस्पृश्याच्या मुलांना नादारी किंवा शिष्यवृत्ती मिळायची त्यामुळे योगीराज व त्यांच्या बहिणीला नादारी मिळत असे. त्यांचे वडील थोडेफार सामाजिक चळवळीत असायचे. डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या विचाराने आणि चळवळीने जागृत झालेले म्हणून त्यांनी गावकीची गुलामीची कामे कधीच केली नाहीत. शिक्षणाचे महत्त्व त्यांच्या वडिलांना समजलेले होते. म्हणून सर्व मुलांना त्यांनी शिकविलं गावात मॅट्रीक पर्यंतची शिक्षणाची सोय होती. नेहमी वर्गात

प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण; योगीराज बाघमारे होत असल्यामुळे त्यांना समाजकल्याण खात्याची शिष्यवृत्ती मिळत होती. त्यामुळे त्यांच्या घरच्या परिस्थितीला तेवढाच हातभार लागत असे. योगीराज वाघमारे यांचे महाविद्यालयीन शिक्षण हे पूर्णत: सरकारी शिष्यवृत्तीवर झाले. त्यांना दरमहा ३० रूपये मिळायचे. त्या पैशावरती महिना काढावा लागत असे. पैशाअभावी आपल्या चार-पाच मित्रासह खोली करून राहत असत. गावाकडून त्यांना मदत फार कमी असायची. एकदा तर सुट्टीनंतर कॉलेजला जायला पैसे नव्हते. त्यावेळी त्यांच्या वडिलांनी पितळी घागर, बादली गहाण ठेवून पैसे दिले, पण ती भांडी परत त्यांना सोडवून आणता आली नाहीत. तशातच त्यांच्या आईचे आजारपण, कामधंद्याची अनिश्चितता नसायची अशा अवस्थेत ग्रॅज्युएशन पूर्ण केले. पण हे शिष्यवृत्तीमुळे घडले. अन्यथा ते शिकू शकले नसते.

योगीराज वाघमारे यांना घरची गरीबी, आईवडिलांचा कष्टाळू पिंड, दारिद्र्याची आणि कष्टाची जाणीव लहानपणापासूनच झाली. त्यामुळे त्यांनी कधी हट्ट किंवा आग्रह धरला नाही. योगीराज यांना वाटायचे की हाल अपेष्टातही शिक्षण घेतले पाहिजे व आईवडिलांच्या श्रमाचे, कष्टाचे चीज केले पाहिजे. तसेच त्यांच्या घरी अधुनमधून सामाजिक चळवळीतली नेते मंडळी यायचे, त्यांचे बोलणे ते ऐकायचे. बाबासाहेबाच्या मोठेपणाबद्दल, त्यागाबाबत आणि विद्वतेबाबत त्यांना ऐकायला मिळायचे त्यामुळे त्यांच्या मनात समाजाबद्दल आस्था व समाज जोडण्याची भावना जागृत झाली होती. अशा काळात 'जनता' आणि 'प्रबुद्ध भारत' ही वर्तमानपत्रे भीमनगर मध्ये येत असत व ती पत्रे योगीराज वाघमारे चावडीत वाचून दाखवत असत. चळवळ, धर्म, साहित्य आणि समाजाविषयीच्या संस्काराचा प्रभाव योगीराज वाघमारे यांच्यावर पडला गेला.

**मित्राकडून मिळालेले संस्कार**

व्यक्ती ज्या समाजात जन्माला येते त्या समाजातील मित्र व स्नेही जोडले जातात. योगीराज वाघमारे हे गावकुसाबाहेर आपल्या वस्तीत राहात असल्यामुळे तेथील

महारवाडा व मांगवाड्यातील मुलांच्या मनामध्ये एकोप्याचे, आपुलकीचे वातावरण होते. डॉ. बाबासाहेब यांच्या चळवळीचा प्रभाव त्यांच्या बालमनावर झाला होता. योगीराज यांच्या दलित व अन्य मागास जातीची मुले त्या ठिकाणी असत. त्यामुळे सहजीवनाचा फार मोठा संस्कार वाघमारे यांच्यावर झाला होता. या वसतिगृहातील अनेक विद्यार्थी त्यांचे मित्र होते. आत्माराम नवले नावाचा लिंगायत समाजाचा त्यांचा मित्र होता. वाघमारे व आत्माराम यांची खूप घनिष्ठ मैत्री होती. त्याच्यामध्ये जातीची कटुता नव्हती वैर नव्हते. सहकार्याची व आपुलकीची भावना होती. असे संस्कार त्यांना बालमित्राकडून प्राप्त झाले.

**स्वभाव**

योगीराज वाघमारे यांच्या घरात भाऊ-बहिणींचा गराडा असायचा. पै-पाहुण्यांची वर्दळ असायची, चुलते आणि त्यांचे कुटुंब सुख दु:खात सहभागी असायचे. त्यामुळे त्यांच्यात आपुलकी, एकमेकांबद्दल जिव्हाळा होता. त्यांच्या बहिणी त्यांना जीवापाड जपायच्या. त्यांच्या घरात प्रेमळ वातावरण होते. तसेच त्यांना इतराबद्दल कळवळा उत्पन्न व्हायचा. नातलगाबद्दल अभिमान होता. सण-उत्सव, लग्नसमारंभ किंवा आंबेडकर जयंती व समाज यांच्याबद्दल वाघमारे यांना अतिशय ओढ होती. यामुळे वाघमारे यांची समाजमनाची जाणीव नकळत दृढ झाली. एकमेकाला समजून घेणे, मदत करणे हा त्यांचा स्वभावच बनला. शाळेत मिसळून वागणे, खेळ खेळणे व गंमती करणे हा त्यांचा स्वभाव बनला. मित्रांबद्दल त्यांना आत्मियता निर्माण झाली. त्यांनी आयुष्यात अनेकांशी मैत्री केली. बहूश्रुतता हा गुण त्यांच्या अंगी होता. त्यामुळे पुढे शिक्षकी पेशा स्विकारल्यानंतर ह्या गुणांचा खूप फायदा झाला.

**वाचनाचा छंद**

सामान्य कुटूंबात जन्मलेल्या मुलांचे छंद हे कसे असणार? योगीराज वाघमारे हे एका सामान्य गरीब कुटुंबात जन्माला आले. त्यामुळे त्यांच्या परिस्थितीचा परिणाम

त्याच्या छंदावर झाला. रोजच्या उदरनिर्वाहाची काळजी त्यांच्या कुटुंबाला असे, त्यांच्या आईवडिलांना रोजगार मिळेल तो दिवस अत्यंत सुखाचा वाटायचा, लहाणपणी त्यांना मित्रासमवेत असताना, तसेच शाळेच्या वातावरणात असताना काही छंद जडले होते. खेळाची सर्वांनाच आवड असते. त्यामुळे योगीराज वाघमारे यांनासुद्धा लहानपणी खेळायला खूप आवडत असे. पण त्यांनी कोणत्याच खेळात नैपुण्य मिळविले नाही, कारण त्यांना खेळायला सवड मिळत नसत. आईबरोबर ते कधी-कधी शेतात जायचे. येताना सरपण, गवत किंवा भाजी घेऊन यायचे तेवढाच आधार ते देत असत. शाळेमध्ये गुरूजी त्यांना गोष्टीची पुस्तके वाचायला देत. त्यातूनच त्यांना वाचनाचा छंद निर्माण झाला. शाळेत गोष्टीची पुस्तके वाचायला मिळायची. त्यातून त्यांना काल्पनिक कथा गोष्टी, रंजक माहिती व राजाराणी, परी, राक्षस, भुत, चेटकीण अशा अद्भूत रम्य गोष्टीची आवड निर्माण झाली. तसेच प्रबुद्ध भारत-जनता ही समाज चळवळीची वृत्तपत्रे ते वाचून दाखवायचे त्यातून समाजदर्शन त्यांना घडत गेलं. यातूनच त्यांना वाचनाचा छंद जडला. तसेच वाचन, लेखन आणि उत्कृष्ट पुस्तकांचा संग्रह करण्याचा छंदही त्यांना लागला.

**नोकरी आणि बढती**

१९६६ ला योगीराज वाघमारे यांनी बी. ए. पूर्ण केले. नोकरीबद्दल योगीराजचे वडिल म्हणायचे की, ''अगूदर जी नवकरी येईल ती करावी. हातचं टाकून पळत्याच्या मागे लागू नये.''[१] तसेच त्यांच्या गावच्या संस्थेत ते ज्या शाळेत शिकले त्याच संस्थेत नोकरी करावी असे त्यांच्या वडिलांना वाटत असे. एका संस्था चालकाने त्यांना संधी दिली. गावापासून १० कि. मी. अंतरावर असलेल्या 'मोहा' ता. कळंब येथील शाळेवर त्यांची नेमणूक झाली. पण काही दिवसातच त्यांना वाईट अनुभव आला. जातीयतेच्या कारणावरून त्यांनी ती पहिली नोकरी सोडली. त्यानंतर उस्मानाबाद

जिल्हापरिषदेत शिक्षण विभागात सहशिक्षक पदावर त्यांची नेमणूक झाली. जिल्हापरिषद प्रशाला तळेगाव. ता- अहमदपूर जि. उस्मानाबाद या शाळेवर १९ जुलै १९६६ रोजी त्यांनी नोकरीचा प्रारंभ केला. नंतर माध्यमिक शाळेत शिक्षक म्हणून उस्मानाबाद जिल्ह्यात विविध ठिकाणी काम केले. त्यांनी जिल्हापरिषद प्रशाला तळेगाव (१९६६), लाअजना (१९६९), दहिफळ (१९७०-७२), उस्मानाबाद (१९७२-७६), ईट (१९७६-८०) व उस्मानाबाद (१९८०-८६) इत्यादी ठिकाणी त्यांनी १९६६ पासून १९८६ पर्यंत शिक्षक म्हणून नोकरी केली. यामुळेच त्यांना अकरावी-बारावीच्या वर्गांना शिकवायची संधी मिळाली. त्याचवेळी त्यांनी महाराष्ट्र राज्य स्पर्धा परीक्षेची तयारी करून शिक्षण सेवा वर्ग II मध्ये बढती मिळाली व पुढे त्यांनी राजपत्रित अधिकारी म्हणून काम केले. शिक्षणसेवक वर्ग II मुख्याधिकारी ता. परंडा, या ठिकाणी नोकरी केली. तसेच प्रशाला कळंब या ठिकाणीसुद्धा मुख्याधिकारी म्हणून काम केले. त्यानंतर जिल्हापरिषद उस्मानाबाद, जिल्हापरिषद सोलापूर या ठिकाणी उपशिक्षणाधिकारी, सोलापूर येथे प्रकल्प अधिकारी व जिल्हापरिषद प्रशाला तुळजापूर येथे मुख्याध्यापक अशा विविध पदावरती १९८६ पासून ते १९९६ या दहा वर्षात द्वितीय श्रेणीतील पदावरती काम केले.

१९९६ नंतर त्यांना शिक्षणसेवा वर्ग I मध्ये बढती मिळाली. त्याप्रमाणे त्यांनी १९९६-९७ मध्ये DIET परभणी येथे ज्येष्ठ अधिव्याख्याता, १९९७-९८ मध्ये बीड येथे जिल्हा प्रौढशिक्षणाधिकारी, १९९८-९९ मध्ये STEM येथे ज्येष्ठ अधिव्याख्याता व त्यानंतर ते १९९९-२००० मध्ये जिल्हापरिषद उस्मानाबाद येथे प्राथमिक शिक्षणाधिकारी व त्यानंतर २०००-०१ मध्ये अहमदनगर येथे प्रौढ शिक्षणाधिकारी व जून २००१ ते ३० सप्टेंबर २००१ मध्ये DIET सोलापूर येथे प्राचार्य अशा विविध मुख्य पदावरती योगीराज वाघमारे यांनी नोकरी केली. सध्या ते सेवानिवृत्त आहेत. योगीराज वाघमारे हे सध्या प्रबुद्ध रंगभूमीचे प्रमुख सल्लागार आहेत.

**लेखक म्हणून झालेली जडण-घडण**

योगीराज वाघमारे यांना शालेय जीवनापासूनच लेखनाची आवड होती. प्राथमिक शिक्षणापासून ते महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत त्यांना लेखनाचे ज्ञान मिळाले प्राथमिक शिक्षण घेत असताना त्यांना शिक्षक फारच चांगले भेटले होते. त्यांनी चांगली शिकवण दिली. वाघमारे हे वर्गात हुशार असल्यामुळे 'मॉनिटर' हे पद त्यांना मिळत असे. त्यामुळे त्यांच्या अंगी नेतृत्वगुण आपोआप प्राप्त झाले होते. तसेच गोष्टीची पुस्तके वाचल्यनंतर ती गोष्ट जशीच्या तशी ते सांगत असत. त्यामुळे त्यांच्यात कथनशैली निर्माण झाली. ते इयत्ता चौथीत असताना २६ जानेवारीला त्यांच्या वर्गातर्फे 'गड आला पण सिंह गेला' या नाटकात त्यांनी सूर्याजी पिसाळची भूमिका केली होती. हा त्यांचा पहिला सांस्कृतिक कार्यक्रमातला सहभाग होता.

योगीराज वाघमारे यांचे चुलते व चुलतभाऊ उस्मानाबादला शिकायला होते. सुट्टीत ते गावी येत असत. त्यावेळी त्यांच्या शाळेतील, वस्तीगृहातील गप्पा रंगवून सांगायचे, तसेच छान-छान गोष्टीची पुस्तके आणत असत. योगीराज वाघमारे त्यांच्या गोष्टी ऐकण्यात आवड होती. एकदा त्यांचे चुलते व चुलतभाऊ यांनी शाळेचे हस्तलिखित आणले होते. ते पाहून योगीराज यांची जिज्ञासा वाढली. त्यातून योगीराज यांना आपण ही हस्तलिखित लिहावे असे वाटले. त्यांनी मित्राच्या नावावार एका वहीत हस्तलिखि त तयार केले. त्यानंतर पुस्तकातील उतारे, कविता, गोष्टी वाघमारे यांनी आपल्याच नावावर खपवून हस्तलिखित तयार केले. या उपक्रमाबद्दल त्यांच्या हेडमास्तरानी कौतुक केले होते. तसेच शाळेच्या गॅदरिंगमध्ये पिंदी एकांकिकेत त्यानी भाग घेतला होता सातवीला असताना वाघमारे यांनी चुरशीने निवडणूक लढवून स्नेहसंमेलनात विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून निवड झाली होती. शाळेत वक्तृत्व स्पर्धेत ते भाग घेत. भीमनगर मध्ये सिद्धार्थ विद्यार्थी मंडळ असायचे. त्यामध्ये ते वक्तृत्व स्पर्धेत भाग घेऊन बक्षिसे मिळवत असत. डॉ. आंबेडकर जयंतीला गावोगावी जाऊन त्या

ठिकाणी भाषण करायचे. एवढेच नव्हे तर त्यांनी 'नवी वाट', 'डाग' इत्यादी नाटकाचे प्रयोगही आसपासच्या खेड्यात करीत असत. या अशा प्रयोगामुळे योगीराज यांच्यात सभाधीटपणा, चौकसपणा. बहुश्रुतता हे गुण निर्माण झाले होते.

मिलिंद महाविद्यालयातील गुरूजन आणि तेथील लायब्ररी यामुळे योगीराज वाघमारे यांच्या चौफेर दृष्टीला लेखनाची साथ मिळाली.मिलिंद कॉलेजमध्ये विविध उपक्रम आणि स्पर्धा होत असतं. विद्‌वान मंडळी येत असत. वेगवेगळ्या विषय समिती कार्यरत होत्या. मार्गदर्शन मिळत होते. अशा या महाविद्यालयामधून वाघमारे यांनी लातूरच्या दयानंद महाविद्यालयाच्या कथास्पर्धेत भाग घेतला होता. त्यांच्या कथेला दुसरे बक्षीस मिळाले होते. कामगार कल्याण केंद्राने निबंध स्पर्धा घेतली. त्यात त्यांना पहिले बक्षीस मिळाले होते.कॉलेजमधील वक्तृत्व स्पर्धेतही त्यांचा सहभाग असायचा. रानडे वक्तृत्व स्पर्धेसाठी कॉलेजचे प्रतिनिधीत्व त्यांनी केले होते. वाघमारे यांनी मिलिंद महाविद्यालयात 'मिलिंद' नावाचे Wall-paper हस्तलिखित प्रा. रायमाने यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केले होते. त्यांचे संपादक योगीराज वाघमारे होते. त्या नियतकालिकात त्यांच्या दिनकथा प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यांच्या जीवनात एक क्रांतिकारी घटना घडली ती म्हणजे वाघमारे यांची जनरल सेक्रेटरी म्हणून निवड झाली होती. त्याचप्रमाणे १९६५-६६ चा 'मिस्टर मिलिंद' हा सर्वोच्च आदर्श विद्यार्थ्याचा बहुमान योगीराज वाघमारे यांना मिळाला होता. मिलिंद महाविद्यालयासारख्या मोठ्या कॉलेजात त्यांच्यासारख्या खेडूत मुलाची निवड होणे म्हणजे वाघमारे यांच्यासाठी अविस्मरणीय गोष्ट होती. ते मिलिंद महाविद्यालयाचे भूषण ठरले. अशा वाटचालीत त्यांना चांगले शिक्षक, मार्गदर्शक लाभले. त्यामुळे त्यांचा लेखनप्रवास सुलभ झाला.

प्राथमिक शाळेत असताना सुशिलाबाई गोखले यांनी वाघमारे यांना अवांतर गोष्टीची पुस्तके वाचायला शिकविले. त्या छान गोष्टी सांगत असल्यामुळे त्यांना गोष्ट, कथा वाङ्मयाची आवड निर्माण झाली. माध्यमिक शाळेतसुद्धा शिक्षकांनी योगीराज

वाघमारे यांना लेखनाची आवड निर्माण करून दिली होती. त्यांनी वाचनालयाची पुस्तके, तसेच लायब्ररीच्या कपाटाची किल्लीसुद्धा त्यांच्याकडे देत असत. शालेय स्पर्धेत भाग घेण्यास शिक्षक मदत करीत होते. मिलिंद महाविद्यालयात असताना प्रा. रायमाने यांचे खूप सहकार्य त्यांना मिळाले होते. हस्तलिखित, वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धेत त्यानी योगीराज यांना प्रोत्साहीत करण्याचे काम केले, तसेच प्रा. गंगाधर पानतावणे हे त्यांचे वाङ्मय गुरू आहेत. वक्तृत्व, वाचन, समाजाप्रती प्रेम आणि वैचारीक बैठक हे पानतावणे सराच्याकडून मिळालेले संस्कार होत.

**लेखनाच्या प्रेरणा -कौटुंबिक व सामाजिक प्रेरणा**

योगीराज वाघमारे हे प्रगल्भ व चिंतनशील, सौम्य, सोज्वळ व्यक्तिमत्व म्हणून उभ्या महाराष्ट्राला परिचित आहेत. अशा विचारशील, संवेदनशील, सकारात्मक दृष्टिकोनाचा एक महान साहित्यिक योगीराज वाघमारे यांच्या रूपाने मिळाला आहे. अशा साहित्यिकामागे कुटुंबाच्या सुद्धा काही प्रेरणा आहेत. त्यांच्या पत्नी सौ. मंदाकिनी योगीराज वाघमारे व त्यांचा मुलगा गौरव यांनी त्यांच्या लेखनास वारंवार मदत केली. त्यांचे लग्न आईवडिलांच्या पसंतीने झालेले होते. बौध्द संस्कार पद्धतीने त्यांचा विवाह झाला होता. त्यांचे वैवाहिक जीवन सुखाचे आहे. त्यांच्या आई-वडिलांची सेवा करण्याचे भाग्य त्यांना मिळाले नाही. पण त्यांनी दिलेली प्रेरणा मात्र योगीराज वाघमारे यांना लाभदायक ठरली. पाहुण्यांचे आदरातिथ्य करणे, नातेवाईकांची विचारपूस, गरजवंतांना मदत करणे अशा गोष्टी वडिलांकडून मिळाल्या. त्यांच्या पत्नीला वाघमारे यांचा लेखनाचा छंद फारसा आवडत नसे. लेखन-वाचन, गावोगावी भाषणाला जाणे, परिषद सभा आणि मित्रमंडळीत सतत वावरणे ह्या गोष्टी पसंत नव्हत्या, पण तरीही त्यांच्या पत्नीने त्यांना कधी विरोध केला नाही. कधीसुद्धा योगीराज वाघमारे यांच्या आवडी-निवडीला मुरड घातली नाही. खूप सहनशील स्वभावाच्या त्यांच्या पत्नी आहेत. पुस्तक खरेदी, मासिकाच्या वर्गणी आणि प्रवासाचा खर्च वाढत होता. पण

त्याप्रमाणे मासिक प्राप्ती फार कमी होती. तरीसुद्धा घरातील व्यक्तींच्या सहकार्यामुळे त्याचे लेखन चालू राहिले. त्यांच्या लेखनाच्या प्रेरणेपाठीमागे सारे श्रेय त्याच्या आई-वडिलांच्या कष्टास आणि घरातील सर्व सदस्यांना त्यांनी दिले. कारण त्यांच्यामुळेच योगीराज वाघमारे यांची सद्सद्विवेक बुद्धी कुठल्याही क्षणी डगमगली नाही व ती तशीच जागृत राहिली. तसेच ते कधी यशाने, प्रगतीने हुरळून गेले नाही की अपयशाने किंवा अपमानाने व्यथित झाले नाहीत.

**सामाजिक प्रेरणा**

योगीराज वाघमारे यांना समाजाबद्दल तळमळ व आत्मियता होती यातूनच त्यांचा परिणाम त्यांच्या लेखणीवर झाला. आंबेडकरी विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होता. त्यांनी शंकरराव खरात, वि. स. खांडेकर अशा साहित्यिकांचे साहित्य शाळेत असताना भरभरून वाचले. त्यामुळे साहित्य लेखणाची आवड निर्माण झाली. मिलिंद महाविद्यालयात शिकत असताना लातूरच्या दयानंद कॉलेजमध्ये कथा स्पर्धेत आपली कथा पाठविली होती व त्या कथेला दुसरे पारितोषीक मिळालेले होते. त्यानंतर 'आक्का' नावाची कथा कॉलेज मॅक्झीन मध्ये प्रसिद्ध झाली होती यामुळे लिखाणाबद्दल त्यांचा आत्मविश्वास वाढला. योगीराज वाघमारे यांनी समाजातील अनेक समस्या, दारिद्र्य, जातीभेद, अन्याय-अत्याचार हे स्वत: अनुभवल्यामुळे याचा परिणाम त्यांच्या लेखणीवर झाला. योगीराज वाघमारे हे लहानपणी 'दलित समाजाची जनता', 'प्रक्षुब्ध भारत' या सारखी वर्तमानपत्रे चावडीत वाचून दाखवत असल्यामुळे साहजिकच त्याच्या लेखणीवर ह्या गोष्टींचा प्रभाव पडला.

**योगीराज वाघमारे यांचे साहित्यलेखन**

१९६० नंतर निर्माण झालेल्या दलित साहित्यात योगीराज वाघमारे यांचे स्थान महत्वपूर्ण आहे. योगीराज वाघमारे यांनी कथा, कादंबरी, बालवाङ्मय या क्षेत्रात लेखन करून दलित साहित्यात मोलाची भर घातली आहे. अशा साहित्यिकांच्या साहित्याचा थोडक्यात आढावा घेऊया.

**योगीराज वाघमारे यांचे कथालेखन**

योगीराज वाघमारे हे पददलित (अस्पृश्य) आणि बौध्द-दलित समाजाच्या भावजीवनावर प्रखर सामाजिक प्रत्ययकारी कथालेखन करणारे एक नवोदित कथालेखक आहेत. योगीराज यांच्या कथालेखनांविषयी भालचंद्र फडके म्हणतात की, ''दलित कथा लेखकांच्या नव्या पिढीत योगीराज वाघमारे एक समर्थ कथालेखक आहेत.''[२] यावरून त्यांच्या कथालेखनाचे स्थान समजते. त्यांनी दलित कथेचा प्रांत गजबजून टाकला आहे. योगीराज वाघमारे यांनी कथालेखनाची सुरूवात 'उद्रेक' या कथा संग्रहापासून केली. ती कथा १९७० मध्ये 'अस्मितादर्श' या मासिकातून प्रकाशित झाली याशिवाय 'पूर्वा', 'नागपूरपत्रिका' इत्यादी नियतकालिकातून व विशेषांकातून त्यांच्या कथा विखुरलेल्या आहेत.

**उद्रेक**

योगीराज वाघमारे यांची पहिली कथा 'उद्रेक' ही १९७० मध्ये प्रकाशित झाली असली तरी त्यांचा पहिला कथासंग्रह १९७८ मध्ये प्रकाशित झाला. हा कथासंग्रह अभिनव प्रकाशन, मुंबई यांनी प्रकाशित केला. या कथासंग्रहात १० कथांचा समावेश आहे. योगीराज वाघमारे हे ज्या प्रदेशात जन्मले, वाढले त्या प्रदेशातील व्यक्ती, घटना, प्रसंग यांचे दर्शन ते उद्रेक मधील कथेतून घडवतात. दलित समाजातील दैन्य, दारिद्र्य, अस्पृश्यता, अंधश्रद्धा,अज्ञान यांचे प्रत्ययकारी चित्रण त्यांच्या कथेतून घडते. आजच्या दलित जीवनाच्या बदलत्या संक्रमणाव्यवस्थेचे चित्र ते उद्रेक मधून घडवतात. सहजाविष्कार हा त्यांच्या लेखणीचा अंगभूत गुण आहे. माझं चुकलं, जत्रा, बंड, जागणूक, उद्रेक इत्यादी कथा समर्थ आहेत.

योगीराज वाघमारे यांनी आपल्या कथेतून आजची नवी सुशिक्षीत पिढी मुलाला शिक्षण देण्यासाठी बापाला करायला लागणारा संघर्ष व धर्मांतर केलेल्या दलिताच्या वाट्याला आलेले बहिष्काराचे जीवन कसे जगावे लागते. यांचे प्रत्ययकारी दर्शन 'उद्रेक' मध्ये मिळते.

**'बेगड'**

उद्रेक नंतर बेगड हा त्यांचा दुसरा कथासंग्रह १९७० मध्ये प्रकाशित झाला. हा कथासंग्रह हर्ष प्रकाशन सोलापूर यांनी प्रकाशित केले. या कथासंग्रहात एकूण १२ कथांचा समावेश आहे. दलितांच्यातील ताणतणाव, सुशिक्षित दलित तरुणाची विद्रोहक वृत्ती, सवर्णाकडून दलितांच्यावर होणाऱ्या अन्यायाचे चित्रण, दलिताच्या समस्या, आंबेडकराचे तत्वज्ञान याचे दर्शन या कथासंग्रहातून घडते. दलित समाज आजपर्यंत शिक्षणापासून वंचित होता. आता शिक्षणाने या समाजात क्रांती केली आहे. पण त्यातील काही तरुण सामाजिक बांधीलकी नाकारतात ते समाजाच्या नात्यागोत्याच्या माणसापासून प्रत्यक्ष आई वडिलापासून फटकून वागतात. याचे चित्रण ते 'बेगड' व 'पराभव' या कथेतून घडवितात. या कथासंग्रहाती 'अनुदान', 'बेगड' 'प्रायश्चित', 'उध्वस्त' या कथा महत्वपूर्ण आहेत.

**'गुडदाणी'**

गुडदाणी हा तिसरा कथासंग्रह १९८९ मध्ये मेहता प्रकाशनने प्रकाशित केला. या कथासंग्रहात एकूण १० कथांचा समावेश आहे. गुडदाणी या कथेत तीन पिढ्यातला सास्कृतिक संघर्ष अतिशय प्रभावीपणे अधोरेखित केला आहे. तसेच यंत्रयुगामध्ये पशूजीवन आणि मानवी जीवन निकामी होत असल्याची जाणीव 'यंत्र' या कथेतून घडते.

योगीराज वाघमारे यांनी ग्रामीण जीवनातील समस्येचे दर्शन आपल्या कथातून घडवितात. यामध्ये गुडदाणी 'पराभव', 'लांडगे', 'यंत्र', 'बेगड' या कथा महत्वपूर्ण ठरतात.

यानंतर योगीराज वाघमारे यांनी याच वळणाच्या अनेक कथा लिहिल्या. गुडदाणी नंतर बहिष्कार (२००४), हिरवळ (२००४) हे कथासंग्रह निर्माण केले व दलित कथालेखनात एक समर्थ कथालेखक म्हणून नावलौकिक मिळविला.

## योगीराज वाघमारे यांचे कादंबरीलेखन

दलित साहित्यात अनेक वाङ्मय प्रकाराचा विकास झाला. पण दलित साहित्यात कांदबरी हा वाङ्मय प्रकार प्रबळ व प्रभावशाली ठरला नाही. दलित कादंबरी क्षेत्रात फारच कमी लिखाण झाले. दलित कांदबरीमध्ये अण्णाभाऊ साठे यांचे खूप मोठे योगदान मिळाले. त्यानंतर शंकरराव खरात, बाबूराव बागूल यांनी कादंबरी लेखनाचा प्रवाह चालू ठेवला. त्यानंतरच्या काळात अनेक कादंबरीकारानी दलित कादंबरीक्षेत्र व्यापक करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये योगीराज वाघमारे यांचे कांदबरीलेखन महत्वपूर्ण आहे.

### सभापती

सभापती या कादंबरीने योगीराज वाघमारे यांनी कादंबरीलेखनाला सुरुवात केली. ही कांदबरी 'साकेत प्रकाशन' औरंगाबाद येथून १९९५ साली प्रकाशित झाली .

या कांदबरीतून खेडेगावातील भ्रष्ट राजकीय व्यवस्थेचे वास्तववादी चित्रण होते. खेडेगावातील 'आरक्षण' असणा-या जागेवरती सवर्ण लोक कशा पध्दतीने दबाव टाकतात त्याचा फायदा घेवून आपले सर्वस्व दाखवतात. याचे दाहक वास्तव चित्रण योगीराज वाघमारे 'सभापती' या कादंबरीतून प्रकट करतात.

गावातील सवर्ण लोक 'आरक्षण' असणाऱ्या 'सभापती' या पदावरती एका बॅन्ड वाजविणा-या व्यक्तीची निवड करतात.व सर्व कारभार आपण बघतात व त्या व्यक्तीला नाममात्र महत्व राहते. यातून गावातील दलित आरक्षित व्यक्तीचे सवर्ण समाजाकडून कसे शोषण केले जाते याचे दर्शन या कादंबरीतून घडते. यातून दलित समाजाला मिळणारी वागणूक, दलिताचे शोषण, सवर्ण लोकांचा मनमानी कारभार यांचे दर्शन 'सभापती' या कादंबरीतून घडते.

### शिक्षणनामा

योगीराज वाघमारे यांनी पवित्र अशा शिक्षणक्षेत्रात छत्तीस वर्षे सेवा केल्यानंतर या क्षेत्रात त्यांना जे अनुभव आले. ते त्यांनी 'शिक्षणनामा' या पुस्तकामध्ये मांडले

आहेत. हे पुस्तक ‘प्रबुद्धप्रकाशन’ सोलापूर यांनी २००४ रोजी प्रकाशित केले. हे पुस्तक मनाची पकड घेणारे रसरशीत जीवनानुभव मांडतो.

शिक्षणक्षेत्रात प्रामाणिकपणे व्यक्तीला होणा-या व्यथा वेदनांचे चित्रण शिक्षणनामातून घडते. योगीराज वाघमारे यांनी हे पुस्तक तमाम विनाअनुदानित शाळावर सेवा करणा-या शिक्षण सेवकाना अर्पण केले आहे. विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांच्या बिकट अवस्थेचे दर्शन शिक्षणनामातून घडते. राजकीय धनदांडग्याची शक़्ती प्रामाणिक अशा ध्येयवादी शिक्षण व्यवस्थेला कशी नामशेष करते. याचे दर्शन वाघमारे यांच्या परखड आणि जळजळीत अशा लेखणीतून प्रकट झाले आहे. शिक्षणनामातून वस्तुस्थितीच्या ज़्वलंत, दाहक अनुभूतीचे संदर्भ वाचायला मिळतात. शिक्षणनामा या पुस्तकाविषयी डॉ. चंदनशिवे म्हणतात की, “सदरचे पुस्तक म्हणजे शिक्षण क्षेत्रातील पोखरलेल्या धगधगीत अनुभवांचा वास्तववादी आविष्कार आहे.”[३]

**धुराळा**

शिक्षणनामानंतर योगीराज वाघमारे यांनी धुराळा ही कादंबरी लिहिली. ही कादंबरी प्रबुद्ध प्रकाशनने फेब्रु. २००५ साली प्रकाशित केली. या कादंबरीत ऊस तोडणी (विशेषत: दलित समाजातील) कामगाराच्या व्यथा-वेदनांचे चित्रण केले आहे. योगीराज वाघमारे यांनी आजपर्यंतच्या साहित्य लेखनाच्या विषयापेक्षा एक वेगळा विषय घेतला आहे.

या कादंबरीचा नायक ‘सुदामा’ हा ऊस तोडणी कामगार आहे अशा साध्या, भोळ्या सुदामाच्या जीवनाची कर्मकहाणी व फटकरीने केलेला घात याचे चित्रण ‘धुराळा’ या कादंबरीतून घडते. यामध्ये ऊसतोड कामगाराच्या समस्या, त्या कामगाराच्या मुलांची शिक्षणाची हेळसांड, तेथील कष्टमय स्त्रियांच्या जीवनाचे दर्शन ‘धुराळा’ या कादंबरीतून घडते.

15393

'धुराळा' कादंबरीत हॉटेलमालक, त्रिंबकराव, चिच्या, गबरू, सुदामाची बायको अशी प्रभावी व्यक्तिचित्रणे आहेत. खेडेगावातील बोलीभाषा, वाक्यप्रचार, म्हणी यांचा मेळ घालून ही कादंबरी सजली आहे.

**पडझड**

पडझड ही कादंबरी फेब्रु. २००५ साली 'हर्ष' प्रकाशनने प्रकाशित केली. ही कादंबरी म्हणजे उध्वस्त ग्रामजीवनाचा संवेदनशील मनाने घेतलेला वेध होय.

या कादंबरीत लेखकाना त्यांच्या गावी प्राथमिक शाळेचा माजी कर्तबगार विद्यार्थी म्हणून शाळेच्या कार्यक्रमात सत्काराला बोलावतात. त्यावेळी तेथील गावाची पडझड व कार्यक्रमाच्या ठिकाणच्या माणसाच्या नैतिकतेची कशी पडझड झाली आहे याचे वास्तव चित्रण ते यातून घडवतात. खेडेगावातील गतकाळातील वैभव, त्याकाळची माणसं, त्यांची संस्कृती आज कशी लयाला गेली याचे उत्तम चित्रण 'पडझड' मध्ये येताना दिसते. या कादंबरीत चंदू कांबळे, शेटीबादादा, बुरकुंड्या, किसना, यमुनामावशी इ. प्रमुख पात्रे आहेत. तसेच त्यांच्या गावातील जुन्या वड, चिंच अशा वृक्षाची वर्णनेसुद्धा कादंबरीत महत्वपूर्ण ठरतात. पडझड या कादंरीविषयी डॉ. चंदनशिवे म्हणतात की, "पूर्वीच्या ग्रामसंस्कृतीची, ग्रामजीवनाची पडझड सुरू झाली. याचा संवेदनशील मनाने घेतलेला वेध म्हणजे पडझड होय."[४]

**योगीराज वाघमारे यांचे बालवाङ्मय**

योगीराज वाघमारे यांनी कथा, कादंबरी अशा लेखनाबरोबरच बालवाङ्मय क्षेत्रात सुद्धा लिखाण केले आहे. योगीराज वाघमारे यांनी आंब्याचे झाड (१९९१), शूरवीरांचे माहेर (१९९१) आभाळमाया (२०००) हमिद आणि इतर कथा (२०००) व पिंपळपान (२००३) ही पुस्तके लिहून बालसाहित्यात मौलिक भर घातली.

पिंपळपान हा कथासंग्रह लहान मुलांच्यावर चांगले संस्कार करणारा उत्कृष्ठ कथासंग्रह आहे. योगीराज वाघमारे यांच्या बालकथावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर व

गौतम बुद्ध यांच्या तत्वांचा परिणाम झाला आहे. योगीराज बाघमारे यांनी लहान मुलांच्यावर आंबेडकर, बुद्ध यांच्या विचारांचा प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला आहे. या बालकथासंग्रहातून उद्‌बोधन व आनंद मुलांना प्राप्त करून देतात. पूर्वापार चालत आलेल्या व गौतमबुद्धाची शिकवण देणाऱ्या जातककथांचा वापर करून वर्तमानकाळात मुलांच्यावरती चांगले संस्कार घडवावे या हेतूनी ते बालकथा रंगवतात.

**योगीराज वाघमारे यांना मिळालेले पुरस्कार**

| | पुरस्कार | पु. वितरण | वर्ष |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार (उद्रेक) | महाराष्ट्र शासन | १९८३ |
| २. | उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार (सभापती) | छत्रपती शिवाजी वाचनालय, जामखेड | – |
| ३. | दिनमित्रकार मुकुंदराव पाटील वाङ्मय पुरस्कार (शिक्षणनामा) | तरवडी | २००४ |
| ४. | महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार | महाराष्ट्र शासन | १९९४ |
| ५. | लोककैवारी सामाजिक पुरस्कार | अहमदनगर | २००१ |
| ६. | अस्मितादर्श साहित्य पुरस्कार | – | – |

तसेच १९९९ सालच्या 'मूर्तीजापूर' (अकोला) येथील 'अस्मितादर्श' साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते.

**योगीराज वाघमारे यांच्या समकालीन कादंबरीकाराचे वाङ्मयीन मुल्यमापन**

१९७५ नंतरच्या दलित साहित्यलेखनात योगीराज वाघमारे यांच्या साहित्याला महत्त्वपूर्ण स्थान आहे. योगीराज वाघमारे यांनी दलित कादंबरीची उंची

वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. अशा दलित कादंबरीला व्यापक करण्याचा प्रयत्न अनेक लेखकानी केला. योगीराज वाघमारे यांच्या कादंबरीलेखन कालखंडात अनेक समकालीन कादंबरीकार झाले. त्यांच्या वाङ्मयीन मुल्यमापनाचा थोडक्यात आढावा घेऊया.

**माधव कोंडविलकर**

योगीराज वाघमारे यांच्या कादंबरीलेखन काळात माधव कोंडविलकराचे कादंबरीलेखन महत्त्वपूर्ण ठरते. माधव कोंडविलकरानी 'अजून उजडायचं आहे' (१९८१), अनाथ (१९८१), छेद (१९८२), वेध, हाताची घडी, तोंडावर बोट, काही कडू काही गोड, अग्निदिव्य अशा कादंबऱ्या लिहिल्या.

माधव कोंडविलकर हे संयम व्यक्तिमनाचे लेखक आहेत. वाट्याला आलेले भोग स्वीकारीत ते पुढे जाताना दिसतात. स्वतःच्या अनुभवातील कृत्रिमत्ता ते टाळताना दिसतात. त्यांच्या काही कादंबऱ्या या त्यांच्या वैयक्तिक जीवनातील अनुभवांशी संबंधित आहेत. गावकी, गरीबी, जात, अशिक्षितता यानी गांजलेले अनेक लोक खेड्यापाड्यात दिसतात. अशा पिळवणूकीत सापडलेल्या लोकांच्या व्यथा माधव कोंडविलकर आपल्या कादंबरीतून मांडतात. समाजातील दुःख, दैन्य, अज्ञान अशा अस्वस्थ विषयावर ते कोणतेही भाष्य न करता तटस्थपणे लेखन करतात. त्यांच्या कादंबरीमध्ये सर्वच दलित पात्रे येत नसून काही उच्चवर्णीय, सज्जन परोपकारी पात्रे सुद्धा त्यांच्या कादंबऱ्यात येतात. माधव कोंडविलकरांच्या दलित कादंबरीचे स्वरूप वेगळे आहे, अनुभवक्षेत्र समृद्ध व संपन्न आहे. ते समाजनिष्ठ असे लेखन करणारे माधव कोंडविलकर आहेत. याच बरोबर त्यांनी कांही महत्त्वाच्या कथांचे लेखन ही केले आहे.

**उत्तम बंडू तुपे**

विविध विषयावर लेखन करून तुपे यांनी आपल्या समकालीनामध्ये वेगळ्या वाटा शोधल्या आहेत. त्यांनी दलित जीवन व ग्रामीण जीवन एकत्रित करून कादंबरीची

निर्मिती केली आहे. त्यांनी 'इंजाळ' (१९८४) ही कादंबरी लिहिली यात मातंग समाजातील शेतकरी व शेतमजूर कुटुंबाचे ग्रामीण आणि दलित जीवनाचे वास्तव चित्रण अत्यंत संवेदनशीलतेने रेखाटतात. अशा पद्धतीने उत्तम बंडू तुपे यांनी 'झुलवा' (१९८६), 'भस्म' (१९९१), 'खाई' (१९८८), कळाशी, चिपाड, खुळी अशा कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांच्या प्रत्येक कादंबरीत ग्रामीण भागातील अस्सल ग्रामीण वास्तव जीवन व दलितांचे व्यापक जीवन यांच्या जाणिवांचे व त्याचप्रमाणे अनेक इतर जाती जमातीचे दाहक अनुभव चित्रण येते. त्यांची प्रत्येक कादंबरी मनमोकळेपणाने अविष्कृत झालेली आहे. ग्रामीण जीवन खऱ्या अर्थाने त्यांनी उत्तेजीत करून पूर्वीचीच ग्रामजीवनाची अनुभूती वेगळ्या मार्गाने मांडल्याचे जाणवते. त्यांची कादंबरी रंजनवादी न आढळता ग्रामीण व दलित समस्यांच्या पार्श्वभूमीवर अस्सल जाणवते. ग्रामजीवन स्पष्ट करते. त्यांनी कादंबरीमध्ये कुठेच जातीय तणावांना स्पर्श केला नाही. याप्रकारे दलित कादंबरी लेखनाला दर्जेदार करण्याचा प्रयत्न उत्तम बंडू तूपे यांनी केला आहे. त्यांचे 'काट्यावरची पोर' हे आत्मचरित्र फारच गाजले आहे.

**श्री योगीराज वाघमारे यांचे वेगळेपण**

योगीराज वाघमारे यांचे दलित कादंबरी लेखनात आपले आगळे वेगळे स्थान आहे. योगीराज वाघमारे यांनी आंबेडकरवादी भूमिका घेऊन कादंबरी लेखन केले आहे. दलितांचे दु:ख, व्यथा, वेदना मांडण्याचा प्रयत्न त्यांनी कादंबरीलेखणातून केला आहे.

योगीराज वाघमारे यांच्या कादंबरीतील ग्रामीण जीवन हे जीवन निष्ठ आहे. ते वरवरचे अथवा उपरे नाही, काल्पनिक तर मुळीच नाही त्यांच्या कादंबऱ्यातील पात्रे ही व्यापक अर्थाने कादंबरीत येतात. तसेच त्यांना व्यापक सामाजिक संदर्भ प्राप्त करून देतात. दलित जीवनवास्तवाचे प्रदर्शन न करता प्रत्ययकारी दर्शन घडविणाऱ्या त्यांच्या कादंबऱ्या आहेत. तसेच साधी, सरळ, अकृत्रिम शैली व अनुभवांची प्रामाणिकता साधून कादंबरी निर्माण झाली आहे. सहजाविष्कार हा त्यांच्या लेखणीचा गुण आहे.

त्यांची लेखणी अंतर्भूत होऊन आत्मपरीक्षण करणारी असल्यामुळे समाजातील अंतर्बाह्य विकृतीवर ती सारखीच प्रहार करते. म्हणून योगीराज वाघमारे यांचे कादंबरीलेखन विद्रोही स्वरूपाचे व समाजोन्मुख आहे. त्यांच्या धुराळा, सभापती, शिक्षणनामा, पडझड ह्या कादंबऱ्यातून वेगवेगळ्या समस्या मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्या नव्या आशयानी सजलेल्या आहेत. त्यांनी कादंबरीमध्ये बोलीभाषा, म्हणी, वाक्यप्रचार, व्यक्तिचित्रणे यांचा प्रभावी वापर केला आहे. तसेच दलित समाजावरती होणाऱ्या अत्याचाराविषयी ते कोणावरही टीका न करता स्वत:च्या समाजातील उणीवांचा आत्मशोध घेताना त्यांच्या कादंबऱ्या दिसतात.

योगीराज वाघमारे हे प्रबुद्ध साहित्य विश्वातील व मराठी साहित्यातील कसदार व प्रतिभावान लेखक आहेत. योगीराज वाघमारे यांच्या साहित्यकृतीत आंबेडकरी विचारांचा परिमल पसरला आहे. अत्यंत सुक्ष्म व तपशीलवार निरीक्षण व संवेदनशीलतेने ग्रहण केलेले अनुभव, आंबेडकरी प्रेरणेतून प्रज्वलीत झालेली व्यापक जीवनदृष्टी यामुळे योगीराज वाघमारे यांचे साहित्य महत्त्वपूर्ण ठरते. योगीराज वाघमारे यांच्या सारख्या प्रतिभावान लेखकाला दलित साहित्यात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. म्हणूनच प्रतिभावंत लेखक योगीराज वाघमारे यांना दलित साहित्यात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

# संदर्भ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | वाघमारे योगीराज | : | 'पडझड' हर्ष प्रकाशन, सोलापूर, प्र. आ., २००५, पृ. ११. |
| २. | फडके भालचंद्र | : | 'दलित साहित्य उद्‌गम व विकास', (योगेंद्र मेश्राम), श्री मंगेश प्रकाशश्र, नागपूर, प्र. आ., १९९८, पृ. २१३. |
| ३. | डॉ. चंदनशिवे सुनिल वा. | : | 'ग्रामीण, दलित नवसाहित्य आकलन आणि आस्वाद', प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, प्र. आ., २००७, पृ. ४८. |
| ४. | डॉ. चंदनशिवे सुनिल वा. | : | 'ग्रामीण, दलित नवसाहित्य आकलन आणि आस्वाद', प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, प्र. आ., २००७, पृ. ४७. |